# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.09.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अबुधाबीचे राजपुत्र शेख खालेद बिन मोहंमद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी चर्चा करणार.
- जीएसटी परिषदेची चोपन्नावी बैठक आज नवी दिल्लीत.
- केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे आजपासून उत्तर प्रदेशातल्या आग्रा इथं राष्ट्रीय आढावा परिषद
- बांगलादेशविरुद्धच्या दोन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी ऋषभ पंतचं भारतीय संघात पुनरागमन

आणि

- पॅरिस पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांचा शानदार सोहळ्यात समारोप

**मोदी भेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अबुधाबीचे राजपुत्र शेख खालेद बिन मोहंमद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी चर्चा करणार आहेत. भारत आणि संयुक्त अरब आमिरात यांच्यादरम्यानच्या विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर दोन्ही नेते चर्चा करणार हेत. शेख खालेद आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. त्यांचं काल संध्याकाळी नवी दिल्लीत आगमन झालं. अबुधाबीचे राजपुत्र म्हणून त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. त्यांच्याबरोबर संयुक्त अरब आमिरातीचे अनेक मंत्री आणि उद्योजकही भारतात आले आहेत. शेख खालेद उद्या एका उद्योगविषयक कार्यक्रमासाठी मुंबईला भेट देणार आहेत.

**जीएसटी परिषद**

वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी परिषदेची चोपन्नावी बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. या वर्षी जून महिन्यात झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत लोखंड, पोलाद आणि ॲल्युमिनियमच्या दुधाच्या कॅनवर बारा टक्के समान जीएसटी दर लागू करण्याची शिफारस करण्यात आली होती. भारतीय

रेल्वेकडून सर्वसामान्य जनतेल्या पुरवल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म तिकिटं, बॅटरी-संचलित कार सेवा अशा सेवांवर जीएसटी लागू केला जाऊ नये अशीही शिफारस या परिषदेनं केली होती.

**एमपॉक्स रुग्ण**

भारतात एमपॉक्सचा एक संशयित रुग्ण आढळला आहे. हा रुग्ण एमपॉक्सची साथ असलेल्या देशातून नुकताच भारतात आला होता. या रुग्णाचं रुग्णालयामध्ये विलगीकरण करण्यात आलं आहे. त्याचे नमुने चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या रुग्णाची प्रकृती स्थिर असल्याचं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. सध्याच्या नियमसंहितेनुसार व्यवस्थापन केलं जात असून, संभाव्य रुग्णांची चाचपणी करण्यासाठी त्या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्यांच्या तपासण्या सुरू असल्याचंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. अशा प्रकारच्या घटनांबाबत उपाययोजनांसाठी देशात पुरेशी तयारी असल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

**अमित शहा**

आपल्या देशातील भाषावैविध्य हा आपलासांस्कृतिक वारसा आहे; याचं जतन करण्यासाठी प्रत्येकानं घरामध्ये मातृभाषेत बोलावंअसं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल मुंबईत केलं. मुंबई समाचार यागुजराती भाषक वृत्तपत्राच्या द्विशताब्दीनिमित्त लघुपटाचं प्रदर्शन शहा यांच्या हस्तेझालं; त्यावेळी ते बोलत होते. स्थानिक भाषांचं संवर्धन गरजेचं आहे.त्यासाठीच मातृभाषेतूनच प्राथमिक शिक्षणावर भर देणारं शैक्षणिक धोरण केंद्र सरकारनेआणले आहे, असं शहा म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह कालपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आहेत. आज दिवसभर ते मुंबईतल्या विविध भागातल्यागणेश मंडळांना भेट देणार आहेत.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी या महिन्याच्या येत्या 29 सप्टेंबरला आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमाद्वारे देश-विदेशातल्या लोकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 114 वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी लोकांना त्यांच्या कल्पना आणि सूचना 1800-11-7800 या टोल फ्री क्रमांकावर 27 सप्टेंबरपर्यंत देता येतील. तसंच माय जीओव्ही संकेतस्थळावरून देखील सूचना पाठवता येतील.हा कार्यक्रम 29 सप्टेंबरला सकाळी 11 वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन प्रसारित करण्यात येईल.

**गणेशोत्सव**

महाराष्ट्रात सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह बघायला मिळत आहे. मुंबई पुण्यासह राज्यातल्या प्रमुख शहरांमधे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण गणेशमूर्तींचं दर्शन घेण्यासाठी

तसंच सामाजिक संदेश देणारे नेत्रदीपक देखावे पाहण्यासाठी आबाल वृद्धाची गर्दी होत आहे. हा महोत्सव परदेशातही उत्साहात साजरा होत आहे. तो विविध देशात कशारितीने गणेशोत्सव साजरा केला जातो हे आपण जाणून घेत आहोत. आज आपण श्रीलंकेत कोलंबो मधल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची माहिती जाणून घेणार आहोत. कोलंबोमध्ये राहणाऱ्या मीनल रेणाविकर यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं...

**चिंतन शिबिर**

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयानं आजपासून उत्तर प्रदेशातल्या आग्रा इथं दोन दिवसीय राष्ट्रीय आढावा परिषद आयोजित केली आहे. चिंतन शिबिर नावाच्या या परिषदेत देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील सामाजिक न्याय आणि समाजकल्याण विभागांचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार आहेत. उपेक्षित समाजाच्या कल्याणाच्या उद्देशानं विविध योजना आणि धोरणांच्या अंमलबजावणीवर या शिबिरात चर्चा करण्यात येईल. केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉक्टर वीरेंद्र कुमार यांच्यासह केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री बी.एल. वर्मा आणि रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचं उद्घाटन करण्यात येईल.

**नायजेरिया स्फोट**

नायजेरियामध्ये काल एका इंधनवाहू टँकरच्या स्फोटात 48 जणांचा मृत्यू झाला. बिदा एगी लपाई महामार्गावर हा अपघात झाला. या टँकरची एका ट्रकशी टक्कर झाल्यामुळे त्याचा स्फोट झाला. इतर दोन वाहनांनाही या अपघातात आग लागली.

**अल्जिरिया फेरनिवड**

अल्जिरियाचे अध्यक्ष अब्देलीमालिद टेब्युन यांची अध्यक्षपदी फेरनिवड झाली आहे. त्यांना सार्वत्रिक निवडणुकीत 94 टक्के मतं मिळाल्यामुळे त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा तिथल्या निवडणूकविषयक राष्ट्रीय प्राधिकरणाचे अध्यक्ष मोहंमद शेरीफ यांनी केली. टेब्युन यांचे प्रतिस्पर्धी अब्देली हसनी शेरीफ यांना तीन टक्के, तर युसूफ औशिशे यांना दोन टक्के मतं मिळाली.

**डीफेन्स**

संरक्षण विभागानं आजपासून दिल्लीत तीन सेवांमधील अधिकाऱ्यांसाठी पहिला संयुक्त आढावा मूल्यांकन कार्यक्रम आयोजित केला आहे. संरक्षण मंत्रालय, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसह तीन सेवांमधील मेजर जनरल आणि समकक्ष अधिकाऱ्यांसाठी हा पाच दिवसीय कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमात धोरणात्मक नियोजन, भविष्यातील

धोके, आव्हानं आणि संघर्षांसाठी योग्य अंदाज आणि तयारी यांचा समावेश असेल. विविध विभांगांमधील समन्वय आणि एकात्मता वाढवणं हे या कार्यक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**बांगलादेश निवड**

बांगलादेशविरुद्धच्या दोन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारताच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. चेन्नईतल्या एमए चिदंबरम मैदानावर 19 तारखेपासून ही मालिका सुरू होणार आहे. के. एल राहुल आणि ऋषभ पंत यांचं संघात पुनरागमन झालं आहे, तर यश दयाल पहिल्यांदाच खेळणार आहे. ऋषभ पंत डिसेंबर 2022 नंतर पहिल्यांदाच भारताच्या संघात खेळणार आहे. रोहित शर्मा संघाचं नेतृत्व करणार आहे.

**पॅरालिम्पिक समारोप**

पॅरिस पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांचा काल रात्री शानदार सोहळ्यात समारोप झाला. मुसळधार पाऊस असूनही स्टेड डी फ्रान्स इथं झालेल्या समारोप सोहळ्याला जगभरातील 4 हजार 400 खेळाडू उपस्थित होते. पुढील पॅरालिम्पिक स्पर्धा 2028 मध्ये अमेरिकतील लॉस एंजेलिस इथं होणार असून पॅरालिम्पिक ध्वज लॉस एंजेलिसच्या महापौर कॅरेन बास यांच्याकडं सुपूर्द करण्यात आला. यंदा भारतीय संघानं आपली सर्वोत्तम कामगिरी करून 7 सुवर्ण, 9 रौप्य आणि 13 कांस्य अशी एकूण 29 पदकं मिळवली.

**पॅरालिम्पिक**

भारतीय खेळाडूंनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आनंद व्यक्त केला आहे. या खेळाडूंच्या यशोगाथा देशातल्या तरुणांना प्रेरणा देतील, असंही राष्ट्रपतींनी त्यांच्या समाजमाध्यमावरील शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.